# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 16/09/2023 (शनिवार) दुपार

---

### नागपूर ग्रामीण जिल्हयाची अवैध धंदयाविरूद्ध विशेष मोहीम

पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो. से.) यांनी आगामी पोळा व गणेशोत्सव सणादरम्यान अवैद्य दारूविरूद्ध विशेष मोहीम सुरू केलेली असुन सदरची मोहीम दिनांक ०६/०९/२०२३ पासुन सुरू करण्यात आली आहे. सदर मोहीमेदरम्यान आजपावेतो १० दिवसात नागपूर ग्रामीण जिल्हयात २३७ आरोपीतांवर कार्यवाही करण्यात आलेली असुन जवळपास एकुण १००४६६५/—रूपयाचा मुद्‌देमाल जप्त करण्यात आलेला आहे. सदरची मोहीम अशीच गणेश विसर्जन पर्यंत सुरू ठेवण्यात येणार असुन पोळा व गणपती दरम्यान गुन्हेगारांवर विविध कलमान्वये प्रभावी प्रतिबंधक कार्यवाही सुद्धा करणार असल्याचे तसेच अवैध धंदयाचे समुळ नष्ट करण्याचे पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो. से.) यांनी सांगितले.

### चोरी

**१) पो.स्टे. एम आय डी सी बोरी** :— अंतर्गत सालईधाबा शिवार येथे दिनांक १४/०९/२०२३ चे ०९.३० वा. ते दिनांक १५/०९/२०२३ चे ०६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— रमेश तुकाराम कुमरे, वय ४५ वर्ष, रा. सालईधाबा ता. हिंगणा जि. नागपूर यांचे सालईधाबा शिवारातील शेताच्या विहीरीत लावलेली पानडुबी इलेक्ट्रीक मोटर ५ एच. पी. ची किंमती अंदाजे ८०००/— रूपयाची कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एम आय डी सी बोरी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा प्रशांत काळे, मो. नं. ९८२२५४९६९५ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कळमेश्वर** :— अंतर्गत जे एस डब्लु कंपनी एम. आय. डी. सी कळमेश्वर येथे दिनांक १४/०९/२०२३ चे १४.०० वा. ते २२.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सुनिल ठारेश्वर श्रीपाद, वय ३२ वर्ष, रा. बस स्टॉप जवळ कळमेश्वर हे स्टील कंपणीत कामाला गेले असता व सायकल स्टॅन्डवर सायकल लावली असता अंदाजे रात्री १०/०० वा. सायकल स्टॅन्डवर फिर्यादी याने ठेवलेली रेन्जर सायकल किंमती अंदाजे ४०००/— रूपयाची कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा धनराज भुक्ते ब. नं. १६७८ मो. क्र. ९८२३६१२८५८ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर